## प्रेसनोट दि.२१/०८/२०१८

## अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखेची कामगिरी

# "परराज्यातील दोघाजणांकडुन तीन कटटे व अठरा काडतुसे हस्तगत"

दि. २०/०८/२०१८ रोजी सुनील दोरगे पोलीस निरीक्षक अं.प.वि.प.गुन्हे शाखा पुणे शहर हे त्यांचे कार्यालयात हजर असताना,त्यांना त्यांचे गोपनिय बातमीदारा मार्फत माहिती मिळाली की,पाषाण लिकं रोड येथे मध्यप्रदेशातील दोघेजण गावठी कटटे व काडतुसे विक्रीस येणार आहेत अशी माहिती मिळाली.ती माहिती पोलीस निरीक्षक श्री सुनील दोरगे यांनी ज्योतीप्रिया सिंह पो उप आयुक्त,आर्थिक व सायबर गुन्हे शाखा पुणे शहर, सहा पो आयुक्त,गुन्हे १ श्री समीर शेख यांना कळविली.त्यांनी सदर ठिकाणी जावुन कायदेशिर कारवाई करणे बाबत सुचना दिल्या.

पोलीस निरीक्षक श्री सुनील दोरगे यांना वरिष्ठांनी दिलेले सुचना व मार्गदर्शनानुसार ते स्वतःतसेच अंमली पदार्थ विरोधी पथकाकडील स्टाफ सहा. पो. फौजदार शिंदे, पो हवा ३४९४ पवार, पो. ना. २०४७ साबळे, पो. ना. २९८५ खिलारे, पो. शि. ८९७६ चंदन पुणे यांनी पोलीस निरीक्षक दोरगे यांना मिळालेले बातमी नुसार बाणेर पाषाण लिंक रोडवरील वैजनाथ टी हाऊस या दुकानासमोर मध्यप्रदेशातुन आलेले दोन इसम नामे - ०१) नरेंद्रकुमार मिहीलाल राजपुत,वय – २५ वर्षे, रा.१४० रमजुपुर,पोस्ट धरमपुर, ता..अजयगड, जि.पन्ना राज्य मध्यप्रदेश ०२) योगेंद्रसिंग बाबुलाल राजपुत, वय -२१ वर्षे,रा.मु.पो देवगांव ता अजयगड,जि.पन्ना राज्य मध्यप्रदेश असे दोघा जणांचे ताब्यातुन एकुण तीन गावठी कटटे व अठरा जिवंत काडतुसे एकुण किं.रु १,५९,०००/- रु चा माल विनापरवाना बेकायदेशिररित्या बाळगताना मिळुन आलेने जप्त करण्यात आला असुन,त्याबाबत चतुःश्रंगी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असुन,गुन्हयाचा पुढील तपास चतुःश्रंगी पोलीस ठाणे हे करीत आहेत.

सदरची कारवाई मा. प्रदीप देशपांडे, अपर पोलीस आयुक्त, (गुन्हे) मा. ज्योतीप्रिया सिंह, पोलीस उप आयुक्त, आर्थिक व सायबर गुन्हे, पुणे व मा. समीर शेख सहा. पोलीस आयुक्त गुन्हे-१, पुणे यांचे मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी पथकाचे प्रमुख पोलीस निरीक्षक सुनिल दोरगे व पोलीस कर्मचारी अविनाश शिंदे, महेंद्र पवार, राजु पाटील,प्रफुल्ल साबळे, शिवाजी राहिगुडे, सचिन चंदन, विठठल खिलारे,राहुल जोशी, यांनी केली आहे.